# नियमीत दिवाणी दावा क्र. ०७/२०१६ मधील नि.५० वरील आदेश

## सीएनआर–एमएचएसएन १२–०००३९–२०१६

(दिनकर कोकाटे वगैरे वि. वसंतराव गायकवाड वगैरे)

प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी नं. २ मयत निवृत्ती मारुती यादव त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेकामी केलेला आहे.

२. वादीने असे कथन केले आहे की प्रतिवादी नं. २ हे दि. ०९/०९/२०१८ रोजी मयत झालेले आहेत. वादीला प्रतिवादी नं. २ चे वारस अर्जात नमूद केल्याप्रमाणे रेकॉर्डवर घेणे जरुरीचे आहे. त्यामुळे अर्ज मंजूर होवून मिळणे गरजेचे आहे अशी मागणी वादीने केली आहे.

३. प्रतिवादी नं. २ चे वारस २अ ते २इ यांना अनुक्रमे नि. ५४ ते ५७ अन्वये नोटीस लागून देखील त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज विना म्हणणे चालविणेत येत आहे.

४. वादीच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्जाचे अवलोकन केले असता वादीला प्रतिवादी नं. २ च्या वारसाविरोधात दावा चालू ठेवणेचा अधिकार (Right to sue survive) असल्याचे वाटत असलेने व अर्ज मंजुर करणे न्यायोचित होणार आहे. परंतु वादीने प्रतिवादी नं. २ चे वारस रेकॉर्डवर घेणेकरिता केलेला उशीर लक्षात घेता अर्ज रक्कम रुपये ५००/– च्या कॉस्ट वर मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब मी खालील आदेश पारित करतो.

## आ दे श

१. वादीचा नि. ५० चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जात मागणी केल्याप्रमाणे वादींनी पुढील तारखेस दाव्यामध्ये तशी दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत पुढील तारखेपर्यंत दाखल करावी.

३. वादीने कॉस्टची रक्कम रुपये ५००/- पुढील तारखेपर्यंत प्रतिवादीस द्यावी.

सही/-

**पलुस.** **(आय. ए. वाय. ए. खान)**

**दिनांक- २०/०६/२०२२** **सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर पलूस**

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mrs. S. V. Kadam<br>Stenographer Grade III |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Palus |
| Date | : | 20/06/2022 |
| Signed by P. O. on | : | 20/06/2022 |
| Uploaded on | : | 20/06/2022 |